राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक- रानिआ २०१३/प्र.क्र.८/का.१२
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २८/१०/२०१३

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचा (सुधारणा) आदेश-२०१३

**नगरपरिषद / नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हापरिषद व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे आदेश.**

**भारताचे संविधान**

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक -- एसईसी / जीईएन २००४ / प्र.क्र.२ / का.६, दि. १३ एप्रिल, २००४ व १६ ऑक्टोबर, २००४ अन्वये नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांबाबत, क्र. रानिआ / मनपा-२००४/प्र.क्र.१३/का.५, दि.७ जानेवारी, २००५, अन्वये महानगरपालिका निवडणुकांच्याबाबत क्र. रानिआ २००५ /प्र.क्र.२४/का.७, दि.३ मे, २००५ अन्वये जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकांच्याबाबत तसेच क्र. रानिआ २००७/प्र.क्र.३/का.८, दि.२८ मार्च, २००७ अन्वये ग्रामपंचायत निवडणुकांच्याबाबत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, मतमोजणीच्यावेळी काही मतदान यंत्रांच्या दर्शक भागांमध्ये (display section) बिघाड झाल्यामुळे त्यावर निकाल दिसत नाही.

आणि ज्याअर्थी, अशा ठिकाणी निकाल पहाण्यासाठी सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश जारी करणे अत्यावश्यक झाले आहे.

आणि ज्याअर्थी, क्रमांक-रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.२०/का.५, दि.२० नोव्हेंबर, २००६ व क्रमांक- रानिआ/२००७/प्र.क्र.३/का.८, दि.२२ मे,२००७ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या दर्शक भागात बिघाड झाल्यामुळे निकाल दिसत नसल्यास अशा ठिकाणी निकाल पहाण्याकरीता सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. मात्र आता राज्य निवडणूक आयोगाने मतदान यंत्रे अद्ययावत करुन घेतली असून त्यानुसार निकाल पहाण्याची कार्यपध्दती सुधारीत करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए अन्वये (४), मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्र.३) चे कलम १८ अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) चे कलम १४(४), महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ९अ(४), व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम १०अ (४) अन्वये तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र या अनुषंगाने यापुर्वीचे उपरोक्त दि.२० नोव्हेंबर,२००६ व दि.२२ मे,२००७ आदेश रद्द करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

ज्या मतदान यंत्रांवर मतमोजणीच्यावेळी मतदान यंत्रांच्या दर्शक भागामध्ये (display section) निकाल दिसत नसेल, त्यावेळी प्रथम मतदान यंत्राची बॅटरी (power pack) संपली असल्यास सोबतचे घोषणापत्र -१ भरुन मतदान यंत्राची बॅटरी बदलावी व निकाल पहावा. असे केल्यानंतर देखील निकाल दिसत नसेल तर, खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

**१) ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल त्या कंट्रोल युनिटचे कॅन्ड सेट सेक्शन उपस्थित उमेदवार / मतमोजणी प्रतिनिधींच्या सोबतच्या घोषणापत्र -२ वर सह्या घेतल्यानंतर उघडावे.**

**२) त्यानंतर ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल, त्या मतदान यंत्रावरील खोचून लावलेली पांढऱ्या रंगाची काढता येणारी मेमरी ओढून काढावी. (यावेळी कंट्रोल युनिटचे मागील ऑन / ऑफ स्वीच बंद असणे आवश्यक आहे.)**

३) राखीव मतदान यंत्रामधील एक कंट्रोल युनिट घ्यावे, ज्यावर कोणतीही मते नोंदविलेली नसतील अशा कंट्रोल युनिटमध्ये ही काढता येणारी मेमरी बसविण्यात यावी. (या ठिकाणी कोठेही बॅलेट युनिट कंट्रोल युनिटला जोडण्यात येऊ नये.)

४) या राखीव मतदान यंत्रामध्ये बॅटरी बसवावी.

५) मागून ऑन / ऑफ स्वीच ऑन करावा.

६) त्यानंतर memory change असा मेसेज येईल. त्यानंतर बॅटरीची क्षमता दाखविली जाईल.

७) वरील डिस्प्ले थांबल्यानंतर Result-II हे बटन दाबून धरावे. त्यानंतर काही वेळाने निकाल दिसायला सुरुवात होईल. (निकालाच्या सुरुवातीला काही मतदान यंत्रामध्ये Bank २ असा मेसेज येईल.)

वरील कार्यपध्दती अवलंबून निकाल पहाण्यात यावा. मात्र असे करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उपरोक्त आदेशासोबत जोडलेल्या घोषणापत्र-२ (declaration-२) लिहून त्यावर सर्व उपस्थित उमेदवार / सर्व मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सह्या घेणे आवश्यक आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

सुनील पोरवाल

( सुनील पोरवाल )
प्रधान सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व आयुक्त, महानगरपालिका
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी
मा. आयुक्त यांचे स्वीय सहायक
मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक
आयोगातील सर्व कार्यासने
निवड नस्ती

# परिशिष्ट

## घोषणापत्र-१

--------------नगरपरिषद / नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हापरिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणूक

प्रभाग क्रमांक -----------------------

मतदान केंद्र क्रमांक -----------------

कंट्रोल युनिट क्रमांक ------------------

वर नमूद केलेल्या कंट्रोल युनिटमधील बॅटरी संपलेली असल्याने ती बॅटरी बदलण्यात येत आहे. संपलेल्या बॅटरीचा क्रमांक--------------- होता व नवीन बॅटरी, जी कंट्रोल युनिटमध्ये बसविण्यात आली आहे तिचा क्रमांक----------- असा आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक :

ठिकाण :

वेळ :

उपस्थित उमेदवार / मतमोजणी प्रतिनिधी यांचे नाव व सह्या

-------------------------------------------------------------------- ------------------------------

-------------------------------------------------------------------- ------------------------------

-------------------------------------------------------------------- ------------------------------

-------------------------------------------------------------------- ------------------------------

# परिशिष्ट

## घोषणापत्र-२

----------------नगरपरिषद / नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हापरिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणूक

प्रभाग क्रमांक -------------------------

मतदान केंद्र क्रमांक -------------------

मूळ कंट्रोल युनिटचा (निकाल दिसत नसलेल्या) क्रमांक -------------------

वर नमूद केलेल्या कंट्रोल युनिटमधील निकाल दिसत नसल्यामुळे त्या कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी खालील राखीव कंट्रोल युनिटमध्ये बसवून निकाल पहाण्यात येत आहे.

राखीव कंट्रोल युनिटचा क्रमांक ---------------------

राखीव कंट्रोल युनिटमधील बॅटरीचा क्रमांक ---------------------

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक :

ठिकाण :

वेळ :

**उपस्थित उमेदवार / मतमोजणी प्रतिनिधी यांचे नाव व सह्या**

| | |
|---|---|
| ------------------------------------------------------------ | ---------------------------- |
| ------------------------------------------------------------ | ---------------------------- |
| ------------------------------------------------------------ | ---------------------------- |
| ------------------------------------------------------------ | ---------------------------- |